**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत सूचना**

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा व वाशिम जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांना विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख यांनी पत्र पाठवून सन २०१८-१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळ सदृष्य तालुक्यातील टंचाईग्रस्त गावांतील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क तातडीने माफ करण्याबाबत आणि त्या अनुषंगीक करावयाची कार्यवाही कळविली असून त्यानुसार सर्व संलग्नित महाविद्यालयांना त्याबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल सहसंचालक, उच्चशिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांना तातडीने सादर करावयाचा आहे आणि त्याची एक प्रत विद्यापीठाला पाठवावयाची आहे.

या संदर्भात महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय निर्गमित केला असून तो महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. याशिवाय या संदर्भात सहसंचालक, उच्चशिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांनी निर्गमित केलेले पत्र त्यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहे. या संदर्भात सर्व संबंधित विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, परीक्षा शुल्क माफीबाबत आपल्या महाविद्यालयाशी संपर्क साधावा. अधिक माहितीकरीता परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख यांचेशी प्रत्यक्ष अथवा कार्यालयीन दूरध्वनीवर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

---

प्रति,

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. १७/१२/२०१८.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी